# बृहन्मुंबई महानगरपालिका

**सहा.अभि./घकव्य/ 13756/ई दि.15/10/2026**

**विषय**:- 'ई' विभागातील रे रोड स्थित डॉ. म्हसकरन्स रोड आणि मॅगेझिन सेंट रोड यांना जोडणारा उड्डाण पुलाच्या उतरंड (डाऊन रॅम्प) च्या खाली असलेल्या मोकळया जागेवरील सुका कचरा वर्गीकरण केंद्र चालवण्याकरीता अशासकीय संस्थांकडून EOI मागविण्याबाबत.

**संदर्भ**:- एम.डीबी/ई/ २७१३ दि. ०६/०७/२०२६.

स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात

'ई' विभागामध्ये कच-याचे प्रमाण शास्त्रशुध्द पध्दतीने कमी करण्याच्या अनुषंगाने विविध ठिकाणी कचरा वर्गीकरण प्रकल्प राबविण्याकरीता शासन नोंदणीकृत कचरा वेचक संस्था / बचत गट व या संस्था व्यतीरिक्त सुका कचरा गोळा व वर्गीकरण कामाचा ३ वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेल्या किंवा सध्यास्थितीत बरोबर अशा प्रकराच्या कामात कार्यरत असलेल्या अशासकीय संस्थांकडून EOI मागविण्याबाबत 'ई' विभागामध्ये विषयांतर्गत कामाकरीता स्वतंत्र संस्थेची सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

| प्रभाग क्र | योजनेचे नाव | कामासाठी निवड करावयाच्या संस्था | अर्जाचे शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| २०८ | रे रोड स्थित डॉ. म्हसकरन्स रोड आणि मॅगेझिन सेंट रोड यांना जोडणारा उड्डाण पुलाच्या उतरंड (डाऊन रॅम्प) च्या खाली | 01 | **रु.400/- अधिक 18 टक्के GST एकूण रु.472/-** |

ईच्छूक संस्थांनी उपरोक्त तक्त्यात नमुद सेंटरसाठी अर्ज करणे अपेक्षीत आहे. सेंटरसाठी स्वतंत्र अर्जा करिता अर्जाचे शुल्क लागू राहिल. सेंटरचे कामाकरिता सोडत काढली जाईल.

अर्जाचा नमुना 'ई' विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे अर्जाचे शुल्क रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. **'बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त'** (Municipal Corporation of Greater Mumbai) या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर दि.16.10.2026 ते दि.26.10.2026 पर्यंत सकाळी 10.30 ते दुपारी 04.00 यावेळेत मिळु शकेल. अर्ज जमा करताना अर्जा सोबत दिलेल्या Annexure मध्ये नमूद सर्व कागदपत्रे व अर्जाचे शुल्क भरल्याची पावती सादर करणे गरजेचे आहे. सोडतीचा दिनांक 'ई' विभाग कार्यालय येथे सुचना फलकावर लावण्यात येईल. सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थेस कामाचे वाटप संबंधीत विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील. तसेच सदर कामाकरीता एक स्वतंत्र संस्था प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येतील. सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या संस्थेचे काम समाधानकारक नसल्यास किंवा कामामध्ये त्रुटी आढळुन आल्यास म.न.पा.च्या प्रचलित पध्दतीनुसार प्रतिक्षा यादीतील संस्थेस सदर काम करण्यासापेक्ष देण्यात येईल.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी 'ई' विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा. संस्थेने 'ई' विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. 27.10.2026 दुपारी 01.00 वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

**सही/-**

**सहाय्यक अभियंता'(घकव्य) 'ई' विभाग**